# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १५/०७/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा.

## दुखापत

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पांलीस स्टेशन फ्रेजरपुरा अप.क्र.५२५ /२०२३ कलम ३२५,५०४ भा.दं.वि | अमरावती | दि ०९/०३/ २०२३ चे १४/३० वा. दाखल ता वेळ दि १५/०७/२ ०२३ चे वा ००४२ | एक महीला | १.संकेत पवार २. करतारसिंग पवार दोन्ही रा. चाळीसगाव | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फियाद्री व आरोपी हे नातेवाईक आहेत आरोपी क्र १ व फिर्यादी यांचे वाद असल्यामुळे फिर्यादी ने नमुद घ ता वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ यांना म्हटले कि मी ८ महीन्याची गर्भवती आहे. असे म्हणत असतांना आरोपी क्र २ हा तेथे आला आरोपी क्र १ ला म्हणाला कि, हीला मारून टाक आपल्याला फक्त चार वर्ष जेल होईल आपल्या आयुष्याची कटकट मोकळी होईल असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळ केली. आरोपी क्र १ याने दगड उचलला फि मागे फिरल्यामुळे दगड लागला नाही. आरोपी क्र १ याने फि च्या पाठीमागुन येवुन फि चे उजव्या कानावर जोरात बुक्की मारली. त्यामुळै फि च्या कानातुन रक्त निघाले. व फि ही खाली पडली. दि २८/०३/२०२३ रोजी डॉ. क्षीतीज पाटील यांच्या कडै इलाज केला असता फि चे कानाच्या पडदयाला मार लागल्याने फाटलेला आहे. असे सांगीतले फि ही गर्भवती असल्याने ऑपरेशन केले नाही. नमुद घ ता वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ पती ने फि ला बुक्की मारल्याने व मार लागल्याने कानाचा पडदा फाटला आहे फि ही गर्भवती व बाळंतपण असल्यामुळे विलंबाने उशीरा रिपोर्ट देण्या करीता आली. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | खो गेट 131/2023 कलम 324, 323, 504, भादवि | फिर्यादीच्या घरासमोर वल्लभ नगर अमरावती | दि 14/07/2023 चे 22.00 वा<br>माहीती - 15/07/2023 चे 0130 वा<br>दाखल - 15/07/23 चे 02.47 वा | स्वप्निल सुनिल चिचोळकर वय 32 व्यवसाय गवळी काम रा वल्लभ नगर अमरावती | मयुर चाळीस गावकर वय 30 वर्षे रा वल्लभ नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी व आरोपी हे शेजारी राहत असुन आरोपी याला दारु पिण्याचे व्यसन आहे नमद घटना ता वेळी व ठिंकिाणी यातील फिर्यादी व त्याचा मित्र पवन ठाकुर हे जेवन करुन फि चे घरी झोपले असता आरोपी हा फि चे घरासमोर येवुन फि ला आवाज दिला फि हे बाहेर आले व आरोपीला म्हणाला की तु माया घरी येवु नको तुझा माझा काही संबध नाही तर आरोपीने फिर्यादीला शिविगाळ करुन गालावर थापडांनी मारहाण केोली तेव्हा फिर्यादी व त्याचे मित्र पवन याने आरोपीला समजावत असताना आरोपीने रोडवरील दगड घेवुन फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केले अशा र्फिर्यादीच्या बयाणावरुन व मेडी सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ९२०/२३ कलम ३८० भादवि | अमरावती | दि १४-०७-२३ चे १७-४५ वा दरमयान<br>दि १५-०७-२३ चे ०१-२३ वा | एक महीला | सनि सेवकराम वधवा रा झुलेलाल लाइन गल्ली न ०२ रामपुरी कँम्प अमरावती | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी व आरोपी हे नातेवाईक असुन आरोपी याने घरातील कपाचामधील ०५ ग्रॅम मंगलसुत्र घेवुन पळुन जात होता फिर्यादी याने पाठलाग केला असता के एल कॉलेज जवळ मंगळसुत्र फेकुन दिले फि ने शोध घेतला .०५ मनी मिळाले एक पेंडण व मनी १ ग्रॅम वजन ३ ग्रॅम कि अं २०,०००/-रु चे मिळाला नाही.अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## वाहन चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अप.क्र.५२५ /२०२३ कलम ३७९ भा.दं.वि. | संकल्प कोचींग क्लासच्या बाहेर , रेल्वे स्टेशन बडनेरा परिसर , बडनेरा | दि.१४.०७.२०२३ चे १३.०० वा. ते १७.०० वा. माहिती दि.१५.०७.२०२३ चे १२.०० वा. दाखल.ता.वेळ दि.१५.०७.२०२३ चे १२.४२ वा. | खुशाल शामराव गवई , वय ३१ वर्षे , व्यवसाय - नोकरी , भुसावळ रेल्वे विभाग , रा.गोकुलधाम कॉलनी , गजाननगर , नवी वस्ती बडनेरा | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी यातील फि.ची ट्युशन बडनेरा येथे ट्युशनला सायकलने गेली होती. कोचींग क्लासच्या बाहेर सायकल उभी करून ट्युशन क्लासमध्ये गेली व ट्युशन क्लास संपल्यानंतर बाहेर आली असता तिला तिची सायकल दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने फि.च्या नातेवाईकाची CT RIDER KIWANO कंपनीची लाल काळ्या रंगाची सायकल किं.अं.२००० रू. अशी चोरून नेली. फि.ने आजपावेतो सायकला शोध घेतला मिळुन आली नाही. अशा फि.चे जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पोस्टे नांदगावपेठ<br>अप क्र २७१/२३ कलम ४५४,३८० भादवी | अमरावती | दि १४/०७/२३ चे १७/०० वा ते १९/३० वा माहीता ता वेळ दि १४/०७/२३ चे २०/०० वा दाखल ता वेळ- दि १५/०७/२३ चे ००/१० वा | एक महीला | अज्ञात | थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आही की नमुद घटणा ता वेळी व ठिकाणी यतील अर्जदार हे दि १४/०७/२३ चे १७ /०० वा.त्याचे घराला कुलुप लावुन त्यांचे त्यांचे नातेवाईक यांचे कडे गेले व १९ /३० वा घरी आले असता त्यांचे घराचे मुख्य दरवाज्याचे कुलुप कोंडा तुटलेला दिसला व आज जावुन महारीले असता बेडरुम मधील लेखंडी कपाट तुटलेले दिसले त्या मध्ये ठेवलेले १) सोन्याचे कानातील दोन जोड प्रत्येकी ३ ग्रॅम असा एकुण ६ ग्रॅम चे कि.अं.१८००० रुपये व नगदी ५०००० रुपये असा एकुण ६८००० रुपयाचे मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला असा फिर्यादी यांचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ९१९/२३ कलम २९४.५०६ (ब) भादवि | सिद्धार्थ नगर अमरावती | दि १४-०७-२३ चे १८-०० वा दरम्यान<br>दि १५-०७-२३ चे ००-१० वा | एक महीला | रंजित रंगराव गाडे रा सिध्धार्थ नगर अमरावती | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी अर्जदार यांनी जुन्या वादातुन ०५-०७-२३ रोजी रिपोर्ट दिला असुन यातील गैरअर्जदार याने माझे विरुद्ध पो स्टे ला रिपोर्ट का दिला असे म्हणुन अश्लील शिविगाळ करीत तुला कापुन टाकेन अशी धमकी दिली व अर्जदार याचे नातेवाईकाला घरासमोर अडवुन तुम्हाला कापुन टाकेन व मारण्याची धमकी दिली अश्या फि चे जबाणी रिपोर्टे वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | खो गेट 132/2023 कलम 142 मपोका | खोलापुरी गेट चौक अमरावती | दि.23 15/07/2023 चे 13.00 वा ते 13.50 वा दरम्यान दाखल -15/07/23 चे 15.18 वा | सरतर्फेराजेंद्र काळे सपोउपनि ब न 853 गुन्हे शाखा अमरावती शहर. | रियाज खान हयात खा वय 29 वर्षे रा सागर नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील आरोपी दोन वर्षाकरीता अम शहर व जिल्ह्यातुन तडीपार असतांना नमुद घटना ता वेळी व ठिकाणी त्याने वरिष्ठाची कोणतीही परवानगी न घेता विना परवानगी शिवाय अम शहरात दखलपात्र गुन्हा करण्याच्या इराद्याने प्रवेश केला नमुद आरोपीने मा पोलीस उपायुक्त परिमंडळ दोन यांचे आदेश क्रमाक उपायुक्त /परि-2/1552/2022दि 14.10.2022 अम शहर यांचे आदेशाचे उल्लंघन केल्याने सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हीशन रेड

| अ.क | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे बडनेरा | अप.क्र.५२४/२३ कलम ६५ (ई) मदाका. | रणजीत धाबा चे बाजुला , जुना बायपास रोड बडनेरा | दि.१४.०७.२०२३ चे २३.२० वा. | दि.१५.०७.२०२३ चे ०१.०८ वा. | सरतर्फे ASI अहेमद अली ब.नं.७८४ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | अमोल मारोतराव पोकळे , वय ३८ वर्षे , रा.बारीपुरा , जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना १)६ नग मॅंकडोवेल्स नं.१ व्हिस्की प्रत्येकी १८० एम.एल.सिलबंद बॉटल किं.अं.९०० रू. २) ४ नग देशी दारू बॉबी संत्रा प्रत्येकी १८० मि.ली.सिलबंद बॉटल किं.अं.२८० रू. असा एकुण ११८० रू.चा माल मिळुन आल्याने घटनास्थळ जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आला. आरोपीचे कृत्य कम ६५(ई) म.दा.का.प्रमाणे गुन्हा होते. अशा फि.चे लेखी फिर्यादवरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे गाडगे नगर अमरावती | अप क्र ९२१/२३ कलम ६५ (ई) मदाका प्रमाणे | अमरावती | दि १५-०७-२३ चे १०-४५ वा | दि १५-०७-२३ चे १३-५२ वा | सरतर्फे पोहवा राजु आप्पा बाहेणकर ब.न.३४२ गुन्हे शाखा अमरावती शहर | एक महीला | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी नमुद महीला आरोपी लहिचेवर गुपत् माहीती वरुन प्रो रेड केली असता तिचे ताब्यातुन ४५ नग देशी दारु पावट्या कि अं ३६००/-रु चा प्रो माल मिवुन आल्याने त्याचे विरुद्ध गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ.क्रं. | पो.ठाणे व मर्ग क्रमांक व कलम | घटनास्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | हकिकत | तपासी अधिकारी नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. वलगाव मर्ग क्रं. २५/२३ कलम १७४ जा.फौ. | सतिनगर वलगाव अमरावती घ.ता.वेळ दि.१४/०७/२३ चे १६.३० वा. दाखल ता.वेळ दि.१५/०७/२३ चे १४.१८ वा. | एक महीला | अशफाक शहा शफिक शहा वय-२६ वर्ष,रा सतिनगर वलगाव अमरावती | गळफास घेतल्याने मृत्यु | हकिकत अशा प्रकारे आहे की, पो.स्टे. वलगाव दि. १४/०७/२०२३ रोजी डि.ओ. ड्युटी असतांना १५.३० वा. मिळालेल्या माहिती ग्राम वलगाव सतिनगर येथे एक महीला आपल्या राहत्या घरी गळफास घेतलेली आहे. अशा माहीती वरुन पो.स्टे.मधुन रवाना होवुन सतिनगर येथे जावुन गळफास घेतलेली महीला ही स्वतःचे राहते घरातल्या लाकडी बल्लीला गळफास घेवुन लटकलेल्या अवस्थेत दिसुन आली. मृतक हीचे घटनास्थळ पंचनामा करुन मृतकास नातेवाईकाच्या व पंचासमक्ष खाली उतरवुन मृतक हीचे इर्वीन दवाखाना अमरावती येथे पि.एम. करुन अंतविधी करीता नातेवाईकाच्या ताब्यात दिले. वरुन सदरचा मर्ग दाखल | सहा.पो.उपनि. दादु दहीकर बनं. ९१९ पो.स्टे. वलगाव |